पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
मा. फ प्रभाग समिती
कार्यपत्रिका क्रमांक – १२
सभावृत्तांत

दिनांक –०४/०२/२०१९

वेळ : स. ११.१५

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. फ प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दिनांक ०४/०२/२०१९ रोजी स. ११.१५ वा. फ प्रभाग कार्यालयाचे राजर्षी शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा. घोलप कमल अनिल — सभापती
२. मा.अश्विनी भिमा बोबडे — सदस्य
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे — सदस्य
४. मा.चिखले सचिन तुकाराम — सदस्य
५. मा. पंकज दत्तात्रय भालेकर — सदस्य

याशिवाय खालील अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.मनोज लोणकर- क्षेत्रीय अधिकारी, मा. प्रभावती गाडेकर-प्रशासन अधिकारी, मा. प्रविण लडकत-कार्यकारी अभियंता(पा.पु.), मा. श्रीकांत सवणे-कार्यकारी अभियंता (स्था), मा. तुपसाखरे संजय - उपअभियंता(पा.पु.), मा.शिंदे हनुमंत-उपअभियंता (ज.नि.) मा. खोंद्रे मोहन ईश्वरा -उपअभियंता (झोनिपूस्था.), मा. सतिश वाघमारे-उपअभियंता (स्था), उपअभियंता स्था.उद्यान, मा. रामगुडे डि. ई.- उपअभियंता (स्था),मा. शहाजी गायकवाड-उपअभियंता (स्था.),मा. पी बी गव्हाणे- क.अभि. स्था.उद्यान, मा. मगर अशोक - कनिष्ठ अभियंता(पा.पु.) मा. क्षीरसागर आर व्ही- क.अभि.(पा.पु.), मा. शेख एस. के. - कनिष्ठ अभियंता ( झोनिपू), मा. जाधव एस. एस. - कनिष्ठ अभियंता(पा.पु.), मा. घोडे एस जी – उद्यान सहाय्यक(वृक्षसंवर्धन), मा.गोसावी जी.आर.-सहा.उद्यान अधिक्षक, मा. कोटीयाना डी.एम.-आरोग्या निरिक्षक पशुवैद्यकिय,मा. मोहननिकम (लेखाधिकारी), हे उपस्थित होते.

मा. कमल अनिल घोलप यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाज सुरु करणेस अनुमती दिली.

मा.सभापती व उपस्थीत सन्मा.सदस्यांचे संमतीने ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले ते खालील प्रमाणे

**विषय क्रमांक -२–** यमुनानगरमधील चौकातील बुद्धविहारामध्ये व समाजमंदिरामध्ये शौचालय बांधणेबाबत

( मा. चिखले सचिन तुकाराम व मा. घोलप कमल अनिल यांचा प्रस्ताव )

**विषय क्रमांक -३–** यमुनानगर येथील सदगुरु दत्त उद्यानामधील जुने वॉचमन क्वार्टर पाडून त्या ठिकाणी नविन वॉचमन क्वार्टर व विरंगुळा केंद्र बांधणेबाबत.

( मा. चिखले सचिन तुकाराम व मा. घोलप कमल अनिल यांचा प्रस्ताव )

Scanned by CamScanner

**विषय क्रमांक-४** -फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. ११ मधील विविध प्रकल्पांचे नामकरणाबाबत मा. फ प्रभाग समिती ठराव क्र. १९ दि. ०४/१२/२०१८ अन्वये सन्मा. प्रभाग समिती सदस्यांमार्फत ठेवलेला विषय सर्वानुमते मान्य करणेत आलेला असुन सदर ठरावान्वये घरकुल प्रकल्प कमान (प्रवेशद्वार) – १) लोकनेते गोपीनाथ मुंडे नगर २) समस्त नेवाळे मळा प्रवेशद्वार असे नामकरण करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

फेडरेशन ऑफ घरकुल सहकारी गृहरचना संस्था मर्या. चिखली,भारिप बहुजन महासंघ व संविधान दिन सोहळा समिती,चिखली यांनी दि. ०७/०१/२०१९ चे पत्रानुसार घरकुल प्रकल्प कमानचे नामकरणास विरोध दर्शविला आहे.

दिनांक २३/०१/२०१९ रोजी आपले सरकार वेबपोर्टलवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने केलेला ठराव दुरुस्त करुन घरकुलचे नामकरण हे प्रचलित नावाप्रमाणेच घरकुल नवनगर संकुल करण्यात यावे अशी तक्रार दाखल केली आहे.

तसेच भगवानबाबा प्रतिष्ठाण-मोरवाडी, जयभगवान महासंघ-पिंपरी व पिंपरी चिंचवड परिवर्तन पार्टी, पिंपळे गुरव यांनी दि. १६/०१/२०१९ व २१/०१/२०१९ चे पत्रान्वये घरकुल प्रकल्पाचे "स्व. गोपीनाथ मुंडे नगर" नामकरण करणेबाबत समर्थन केलेले आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे काही संस्थांनी विरोध दर्शविला असून काही सस्थांनी सहमती दर्शविलेली आहे. तरी सदरचा घरकुल नामकरणा बाबतचा विषय नजीकच्या मा.प्रभाग समिती सभेमध्ये अवलोकनार्थ सादर करणेत यावा.

(प्रशासन विभागाकडील पत्र क्रमांक फक्षेका /१/कावि/१२५/२०१९ दिनांक ०१/०२/२०१९)

मा. सभापती यांनी मा.प्रभाग समिती सभा दिनांक १२/०२/२०१९ सकाळी ११.३० पर्यंत तहकुब करणेत येत आहे असे जाहीर केले व सभा संपल्याचे घोषीत केले.

(कमल अनिल घोलप)
सभापती
फ प्रभाग समिती, निगडी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय,निगडी ४४
क्र.फक्षेका/सभा/कावि/०४/२०१९
दिनांक.०४/०२/२०१९

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव( सभाशाखा )
फ प्रभाग समिती,
निगडी

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Scanned by CamScanner